| MHPA220002652022 | संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ६८/२०२२<br>मोहन<br>वि.<br>वसंत |
|---|---|

## निशाणी १ खालील आदेश

प्रस्तुतचे प्रकरण हे परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये दाखल केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि. १०/०८/२०२२ रोजी आरोपीविरूध्द आदेशिका जारी करण्याचा आदेश पारित केला. आरोपीविरूध्द आदेशिका जारी करूनही आरोपी हजर झाला नाही. त्याच्या उपस्थितीकरिता फिर्यादीने स्टेप घेणे आवश्यक आहे. यापुर्वी वेळोवेळी आरोपीविरूध्द समन्स व जमानती अधिपत्रे जारी केली आहेत तरी देखील आरोपी याकामी हजर नाही. सदरचे प्रकरण हे आरोपीच्या उपस्थितीकरिता फिर्यादीने स्टेप्स घेण्यासाठी नेमण्यात आले होते. फिर्यादीने प्रकरणात मागील बऱ्याच तारखांपासुन स्टेप घेतलेली नाही. त्यामुळे दि.०४/०५/२०२६ रोजी प्रकरण खारिज करण्याच्या आदेशावर ठेवण्यात आले होते. आज रोजी फिर्यादी व फिर्यादीतर्फे वकील यांचा वांरवार पुकारा करता ते गैरहजर. सदरचे प्रकरण हे खारिज करण्याच्या आदेशावर नेमण्यात येवुनही आजरोजी फिर्यादी गैरहजर असुन त्यांनी आरोपीच्या हजेरीबाबत स्टेप घेतलेली नाही. अभिलेखावर मुदतीचा अर्ज नाही. यावरूनच फिर्यादी यांना सदरचे प्रकरण चालवण्यात स्वारस्य नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरचे प्रकरण खारिज करणे उचित होईल असे मला वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. सदरचे प्रकरण हे फिर्यादीच्या अनुपस्थितीमुळे व त्याने याकामी आरोपीच्या उपस्थितीकरिता स्टेप्स न घेतल्यामुळे खारीज करण्यात येते.

MANISHA MAHADEO PATIL

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.07.27 18:02:27 +0530

दिनांक २७/०७/२०२६.

(मनिषा म. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.